॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२४-२५/३७३४ दिनांक : ०६/०२/२०२५

## :: परिपत्रक ::

**विषय : प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या सर्व पदवी व पद्व्युत्तर व व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना कमी गुण प्राप्त झाले आहेत असे वाटते, अशा विद्यार्थ्यांचे गुणपडताळणी, उत्तरपुस्तिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाची आवेदनपत्रे भरून घेण्याबाबत..**

मा. संचालक, सर्व संकुले/ उपपरिसर, लातूर / उपपरिसर, परभणी /मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये/न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ, यांना उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या सर्व पदवी व पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना कमी गुण प्राप्त झाले आहेत असे वाटते, अशा विद्यार्थ्यांचे गुणपडताळणी, उत्तरपुस्तिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकनाचे (तक्रार निवारण (GRM) करिता आवेदनपत्र भरण्याकरिता खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- **विद्यार्थ्यांना लेखी (थेअरी) पेपरची गुणपडताळणी, थेट/सरळ पुनर्मूल्यांकन** (Direct Revaluation), **उत्तरपुस्तिकेच्या छायांकित प्रती** (Photo Copies) **नंतरचे पुनर्मूल्यांकन करता येईल.**

१) अ) गुण पडताळणी (व्हेरीफिकेशन) आवेदनपत्र शुल्क : रू.७५/- प्रती पेपर
ब) उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत आवेदनपत्र शुल्क : रू.३५०/- प्रती पेपर
क) छायांकित प्रती नंतरचे पुनर्मूल्यांकन आवेदनपत्राचे शुल्क : रु.१५०/- प्रती पेपर
ड) थेट पुनर्मूल्यांकन आवेदनपत्राचे शुल्क : रु.३५०/- प्रती पेपर
इ) आवेदनपत्रासाठीचे शुल्क : रु. १०/- प्रती आवेदनपत्र.

२) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत सरळ पुनर्मूल्यांकनाचे (Direct Revaluation) आवेदनपत्र सादर करण्याचा अंतिम **दिनांक ०६/०२/२०२५ ते दिनांक १८/०२/२०२५** असून, या तारखेनंतर कुठल्याही परिस्थितीत आवेदनपत्रे महाविद्यालयाने स्वीकारू नयेत व विद्यापीठाकडे आवेदनपत्र स्वीकारण्यासाठी शिफारस/अग्रेषित करू नयेत.

३) महाविद्यालयांनी Online पध्दतीने आवेदनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक २०/०२/२०२५ राहील.

४) महाविद्यालयांनी पुनर्मूल्यांकन शुल्काचा DD/RTG/NEFT इत्यादीद्वारे सादर करण्याचा दिनांक २१/०२/२०२५ राहील. सदर DD/RTG/NEFT व आवेदनपत्रे सादर करण्याचा दिनांक २२/०२/२०२५ राहील.

५) महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून प्राप्त होणाऱ्या उत्तरपुस्तिकांच्या छायांकित प्रती संबंधित विद्यार्थ्यांना त्वरित वितरीत करून सदर छायाप्रती प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत विद्यार्थ्यांकडून विहीत शुल्कासह (रू. १५०/- प्रती विषय) स्वीकारून ते पुढील दोन दिवसात विद्यापीठाकडे सादर करावेत.

..... २ ...

६) विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत घेतल्यानंतर गुणपडताळणी किंवा थेट पुनर्मूल्यांकन यापैकी एकच सुविधा घेता येईल. याबाबत महाविद्यालयांनी आवेदनपत्रांची छाणनी करूनच महाविद्यालयांच्या प्रतिनिधीमार्फत विद्यापीठात सादर करावेत. कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठविण्यात येऊ नये.

७) एका सत्रासाठी (Semester) फक्त दोन विषयांकरिताच पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल. त्यापेक्षा जास्त विषयांसाठी सादर केलेली आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. महाविद्यालयांनी छाणनी करूनच सदर आवेदपत्रे विद्यापीठामध्ये सादर करावीत.

**टिप-** **१) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल** OV (Office Verification) **मुळे राखीव असतील, तर अशा विद्यार्थ्यांचे गुणपत्रक संबंधित महाविद्यालयांनी आवश्यक त्रुटींची पूर्तता पूर्ण करून प्राप्त करावीत आणि गुणपत्रक प्राप्त झाल्यानंतर पुनर्मूल्यांकनाची आवेदनपत्रे ०५ दिवसांच्या आंत विद्यार्थ्यांकडून स्वीकारून विद्यापीठास स्वतंत्रपणे सादर करावीत.**

**२) ज्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले आहेत, अशा सर्व अभ्यासक्रमांसाठी वर दर्शविलेल्या तारखा व वेळेचे तंतोतंत पालन करण्यात यावे. तसेच ज्या अभ्यासक्रमांच्या गुणपत्रिका प्राप्त झालेल्या नाहीत. अशा सर्व अभ्यासक्रमांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्यानंतर ०७ दिवसांच्या आत पुनर्मूल्यांकनाची** (GRM) **आवेदनपत्रे विद्यार्थ्यांकडून स्वीकारुन विद्यापीठात स्वतंत्रपणे सादर करण्यात यावीत.**

**प्र. संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**
मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव :**
१. मा. संचालक, सर्व संकुले/उपपरिसर, लातूर, परभणी.
२. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये/न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, पदवी/पदव्युत्तर इत्यादी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले असून, त्यापुढील कार्यवाहीसाठी वरील परिपत्रकाप्रमाणे वेळेत कार्यवाही करण्यात यावी.
३. अधीक्षक/सहा. अधीक्षक, सर्व विद्याशाखा, यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करून त्यासंबंधीचा कार्यअहवाल सादर करण्यात यावा.